दैनिक

# लोकरक्षणाय

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

www.lokrakshanay.com epaper. lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com

●कार्यकारी संपादक- अनिकेत घनश्याम भंकाळ ●वर्ष-०१,अंक-२४० ●पृष्ठे-०४ ●ठाणे, शुक्रवार, ०९ फेब्रुवारी २०२४ ●RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ●रु.२/-


## विविध क्षेत्रातAIचा वापर वाढविण्यासाठी राज्य सरकारचा गुगलबरोबर करार, पण त्याने रोजगार घटणार? उपमुख्यमंत्री फडणवीस म्हणतात..

■ **मुंबई, यश सावंत :**

आर्टिफिशिअल इंटेलिजन्स अर्थात कृत्रिम बुद्धिमत्तामुळे जगभरात विविध क्षेत्रात क्रांती झाली आहे. संगणक क्रांतीनंतर एआय मुळे जवळपास प्रत्येक कामाच्या स्वरूपांमध्ये आमूलाग्र बदल होत आहेत. याचाच वापर आता सरकार त्यांच्या प्रशासकीय कामात करणार आहे. यासंदर्भात महाराष्ट्र सरकारचा गुगलबरोबर करारही गुरुवारी झाला. या करारामुळे महाराष्ट्रातील विविध क्षेत्रात आता एआयचा सक्षमपणे वापर केला जाणार आहे. परंतु, एआयच्या वापरामुळे महाराष्ट्रातील रोजगार संपुष्टात येणार का? एआयमुळे किती रोजगार जाणार याबाबत मोठा




प्रश्न निर्माण झालाय. या प्रश्नांवर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर दिलं. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, गुगल एक अत्यंत महत्त्वाची टेक्नोलॉजी कंपनी आहे. या कंपनीचा जगभरात प्रचंड मोठा विस्तार आहे. टेक्नोलॉजीच्या क्षेत्रात ही कंपनी एक पाऊल पुढे राहिली आहे. गुगलने एआयमध्ये मोठ्या प्रमाणात काम केलंय. त्यामुळे त्यांनी लोकोपयोगी एआय विचार मांडला आहे. त्यांची हीच शक्ती महाराष्ट्रात कशी वापरता येईल यासंदभार्तील हा करार आहे. शेती, सस्टेनेबिलिटी, स्टार्टअप, हेल्थकेअर, कौशल्य आदी विविध क्षेत्रात आम्ही (सरकार आणि गुगल) एकत्र काम करणार आहोत. एआयमुळे लोकांचं जीवन बदलू शकतं, प्रशासकीय कामात सुधारणा होऊ शकते. काही ॲप्स त्यांनी दाखवले. त्यानुसार शेतकऱ्याच्या जमिनीत काय पिकवलं पाहिजे, त्याची वाढ कशी झालीय याचं मॉनिटरिंग आणि डेटा मिळू शकतो. या मोबाईल ॲपवरून शेतकऱ्याने काय वापरलं पाहिजे, त्यावर कोणती किड येऊ शकते हे शेतकरी जाणून घेऊ शकतो. असे अनेक ॲप आहेत, असं उदाहरणही त्यांनी दिलं.

### राज्यात रोजगाराच्या संधी घटणार?

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस एआयसंदभार्तील माहिती देत असताना पत्रकारांनी रोजगारासंदर्भात प्रश्न विचारला. या कृत्रिम बुद्धीमत्तेमुळे अनेक रोजगार जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे महाराष्ट्रातही विविध क्षेत्रात कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर झाल्यास किती रोजगारांवर गदा येईल, असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर देवेंद्र फडणवीस म्हणाले, एआयमुळे रोजगाराच्या असिमीत संधी उपलब्ध होणार आहेत. एआय आल्यानंतर रोजगाराचं काय होईल असा प्रश्न सातत्याने विचारला जातो. परंतु, यामुळे नवीन रोजगाराच्या संधी निर्माण केल्या आहेत. त्या संधींकरता आपलं राज्य फ्युचर रेडी होतंय.

## 'क्रीडा संकुलाच्या माध्यमातून देशाचे नाव उज्वल करणारे खेळाडू घडावेत' - मुख्य.एकनाथ शिंदे

### कोपरी येथील ठाणे तालुका क्रीडा संकुलाचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन






■ **ठाणे, विशाल कारंडे :**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुरुवारी कोपरी येथील ठाणे तालुका क्रीडा संकुलाचे उद्घाटन केले. या सोहळ्याप्रसंगी क्रीडा संकुलांच्या माध्यमातून देशाचे नाव उज्वल करणारे खेळाडू घडावेत, असे प्रतिपादन त्यांनी केले. ठाणे शहरातील तालुका क्रीडा संकुल, ठाणे चे उद्घाटन कोनशिलेचे अनावरण करून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते संपन्न झाले, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी विधानसभा सदस्य आमदार प्रताप सरनाईक, माजी आमदार रवींद्र पाठक, माजी महापौर नरेश म्हस्के, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, ठाणे मनपा आयुक्त अभिजीत बांगर, क्रीडा उपसंचालक नवनाथ फरताडे, तहसिलदार युवराज बांगर, जिल्हा क्रीडा अधिकारी सुवर्णा बारटक्के, तालुका क्रीडा अधिकारी तथा तालुका क्रीडा संकुलाच्या सदस्य सचिव सायली जाधव आदि मान्यवर उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री श्री.शिंदे म्हणाले की, जिल्ह्याच्या आणि तालुक्याच्या क्रीडा क्षेत्रासाठी आज आनंदाचा दिवस आहे. खेळाडू आणि एक तंदुरूस्त पिढी घडविणाऱ्या या संकुलाचं आज उद्घाटन होत आहे. ठाण्याचा पालकमंत्री असल्यापासून मी या संकुलाच्या उभारणीचा साक्षीदार आहे आणि आज मुख्यमंत्री म्हणून त्याचं उद्घाटनाचं करण्याचं भाग्य मला मिळालं आहे. मला खात्री आहे या क्रीडा संकुलाच्या माध्यमातून तालुक्यात, जिल्ह्यात नवनवीन खेळाडूंना आपलं कसब दाखविण्याची संधी मिळेल आणि त्यातून चांगले खेळाडू आपल्या जिल्ह्याचं, राज्याचं आणि देशाचं प्रतिनिधीत्व करतील. त्यासाठी माझ्या शुभेच्छा आहेत. ते म्हणाले, ठाण्याला खेळ आणि खेळाडू यांच्या विजयाचा मोठा इतिहास आहे. देशात आणि राज्यात नावाजलेले अनेक खेळाडू ठाण्यात आजवर झालेले आहेत. ठाणे तालुका क्रीडा संकुल हे त्या या क्रीडा क्षेत्रातले पुढले पाऊल आहे. काळाची गरज ओळखून अत्याधुनिक सुविधांसह खेळाडू घडविण्याचे काम इथे होणार आहे. राज्यात खेळ आणि खेळाडूंना पोषक असं वातावरण आहे, असे सांगून ते म्हणाले, प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी आपण 'श्री छत्रपती शिवाजी महाराज पारंपरिक क्रीडा महाकुंभ' स्पर्धेचा शुभारंभ केला आहे. गेल्या महिन्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नाशिक येथे युवा मेळाव्याचं आयोजन करण्यात आलं होते. देशभरातील सर्वच राज्यातील युवा आणि खेळाडू त्यात सहभागी झाले होते. विशेष म्हणजे तब्बल सात वर्षानंतर राष्ट्रीय स्तरावरचा हा युवा मेळवा आयोजित करण्याची संधी महाराष्ट्राला मिळाली होती आणि ती आपण यशस्वी करून दाखवली.

## मुख्यमंत्री शिंदेंच्या वाढदिवसानिमित्त श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती चरणी डॉ. नीलम गोऱ्हे यांनी अर्पण केला ६० किलोचा मोदक !



■ **पुणे अभिजित येरल्लू :**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसानिमित्त विधानपरिषदेच्या उपसभापती तथा शिवसेना नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिर येथे गुरुवारी महाआरती करून ६० किलो वजनाचा मोदक अर्पण केला. शिवसेना पुणे शहर व जिल्ह्याच्या वतीने नीलम गोऱ्हे व अन्य पदाधिकारी यांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. यावेळी शिवसेना पुणे शहर प्रमुख प्रमोद भानगिरे, जिल्हा प्रमुख रमेश कोंडे, शिवसेना कामगार सेना अध्यक्ष सुधीर कुरुमकर, शिवसेना महिला आघाडीच्या पूजा रावेतकर, सुदर्शना त्रिगुणाईत आदी मान्यवरांच्या बरोबरच शिवसेना पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते. यावेळी डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा वाढदिवस विविध समाजोपयोगी उपक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे. श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिरात महाआरती करून आगामी काळात येणाऱ्या निवडणुकांमध्ये शिवसेना, भाजप, राष्ट्रवादी आघाडीस यश मिळावे त्यांचे जास्तीजास्त खासदार, आमदार निवडून यावेत व पुन्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे केंद्रात तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वात राज्यात सरकार स्थापन होवो अशी प्रार्थना केल्याचे सांगितले.

## काँग्रेसचे बडे नेते बाबा सिद्दीकींनी पक्षाच्या सदस्यत्वाचा दिला राजीनामा

■ **मुंबई, सचिन कदम :**

केंद्रीय स्तरावर इंडिया आघाडी आणि राज्य स्तरावरील महाविकास आघाडी यांच्यातील अस्वस्थता आणि बिघाडी समोर येत आहे. काही दिवसांपूर्वी मुंबई काँग्रेसचे बडे नेते मिलिंद देवरा यांनी पक्षाला रामराम करत शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला होता. या घटनेला काही दिवस लोटले असतानाच मुंबईतील काँग्रेसचे दुसरे बडे नेते बाबा सिद्दीकी यांनी काँग्रेस पक्ष सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. बाबा सिद्दीकी राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटात जाणार असल्याची चर्चा राजकीय वतुर्ळात गेल्या अनेक दिवसांपासून सुरू होती. एक्सवर एक पोस्ट शेअर करत बाबा सिद्दीकी यांनी आपला निर्णय जाहीर केला. मी तरुण असताना काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता आणि आता ४८ वर्षांनी पक्ष सोडत आहे. माझा हा प्रवास खूप छान होता. माझ्या पक्ष



सदस्यत्वाचा राजीनाम देत आहे. आणखी अनेक गोष्टी आहेत ज्या आत्ताच सांगणे योग्य होणार नाही. काही गोष्टी या न सांगितलेल्याच बऱ्या असतात. माझ्या या प्रवासात ज्या-ज्या लोकांनी मला पाठिंबा दिला, त्यांचा मी आभारी आहे, असे सांगत बाबा सिद्दीकी यांनी पक्षाला सोडचिठ्ठी दिली. यावरून आता राजकीय वतुर्ळातून प्रतिक्रिया येत असून, राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी भाष्य करत काँग्रेसवर टीका केली आहे. बाबा सिद्दीकी यांचा राजीनामा म्हणजे काँग्रेसमधील प्रचंड अस्वस्थता आणि खदखद यांचे द्योतक आहे. गेल्या अनेक वर्षापासून बाबा सिद्दीकी यांनी मुंबई आणि परिसरात आपले वर्चस्व स्थापन केले आहे. काँग्रेस विचाराची माणसे पक्षापासून का दूर जात आहेत, याचे आत्मचिंतन करण्याची वेळ त्यांच्यावर नक्कीच येणार आहे. ही तर सुरुवात आहे. आगामी काळात असेच काही धक्के पाहायला मिळाले, तर आश्चर्य वाटायला नको, असे सुनील तटकरे यांनी म्हटले आहे. दरम्यान, बाबा सिद्दीकी यांच्या जाण्याने काँग्रेस पक्षाला काही फरक पडत नाही, अशी प्रतिक्रिया काँग्रेस नेते आणि विधानसभेचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी दिली. यावर बोलताना सुनील तटकरे म्हणाले की, ही एक बोलण्याची पद्धत आहे.

## डॉ. मनमोहन सिंग व्हीलचेअरवरून सभागृहात आल्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केलं कौतुक

■ **नवी दिल्ली, प्रगती शर्मा:**

राज्यसभेच्या ५६ खासदारांचे हे शेवटचे अधिवेशन असल्याने सभागृहात गुरुवारी त्यांना निरोप देण्यात आला. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भाषणात माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचं भरभरून कौतुक केले. त्याचसोबत त्यांच्या दीघार्युष्यासाठी प्रार्थना केली. राज्यसभेच्या ५६ जागा रिक्त होणार आहे. लवकरच या जागांसाठी निवडणूक होईल. मात्र विद्यमान ५६ खासदार यांचे हे शेवटचे अधिवेशन असल्याने सभागृहातून त्यांना निरोप देण्यात आला. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, दर २ वर्षांनी या सभागृहात असा प्रसंग येतो. हे सभागृह निरंतर आहे. लोकसभा दर ५ वर्षांनी नव्याने स्थापन होते. मात्र राज्यसभा दर २ वर्षांनी नवीन उर्जा, उमंग, उत्साह निर्माण करतो. हा निरोप नाही तर अशा आठवणी कायम ठेऊन जातात त्या पुढील पिढीसाठी अमुल्य वारसा असतो.



## चूक एका कंडक्टरने केली अन शिक्षा सर्वांना का? महाराष्ट्र एस.टी. कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांचा सवाल



■ **मुंबई, विशाल पाटील:**

एका अपहाराच्या घटनेवरून एसटीच्या सर्व वाहकांना संशयाच्या कठडयात उभे करून, वेठीस धरणे हा केवळ मूर्खपणा आहे. तसेच अपहार रोखण्यासाठी कर्तव्यावर असणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांच्या खिशात हात घालून झाडझडती घेण्याचे उद्दाम परिपत्रक काढणाऱ्या अधिकाऱ्यांना वरिष्ठांनी ताबडतोब समज द्यावी अन्यथा प्रामाणिकपणे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा अशा उद्दामखोर परिपत्रकमुळे उद्रेक होऊन त्याचा परिणाम आंदोलनामध्ये होईल, व तशी वेळ आणू नये,असा स्पष्ट इशारा महाराष्ट्र एस. टी. कर्मचारी काँग्रेसचे सरचिटणीस श्रीरंग बरगे यांनी दिला आहे.

इस्लामपूर (सांगली जिल्हा) आगारांमध्ये एका वाहकाने ओंड्रॉइड मोबाईल मध्ये ॲप तयार करून त्याद्वारे तिकीट विक्री करून अपहार केला व त्या द्वारे एसटी महामंडळाचे उत्पन्न बुडवण्याचा प्रकार घडला, ही घटना दुर्दैवी आहे. पण अशा घटनांमधून एसटीच्या तांत्रिक यंत्रणेचा दोष दिसून येत आहे.एसटीच्या मध्यवर्ती संगणकीय कक्षाचे तिकीट विक्री मशीनवर नियंत्रण असताना असा प्रकार त्यांच्या लक्षात का आला नाही? त्यांना विचारणा करण्या ऐवजी राज्यातील सर्व एसटी वाहकांची तपासणी करावी, किंबहुना महिला वाहकांचे खिसे तपासावेत असे तुघलकी फर्मान वाहतूक विभागाच्या अधिकाऱ्यांनी काढले आहे. अशा कृतीमुळे प्रामाणिकपणे काम करणाऱ्या महिला वाहकांचे मनोधैर्य खच्ची होत आहे. आणि भविष्यात आपल्या कामगिरी बद्दल नैराश्य निर्माण होऊन त्यातून कर्मचाऱ्यांच्या मध्ये उद्रेक निर्माण होऊन पूर्वी साडे पाच महिने संपात होरपळलेल्या एसटीला आणखी एका मोठ्या आंदोलनाला तोंड द्यावे लागेल, अशी परिस्थिती निर्माण होऊ नये, यासाठी अश्या बेजबाबदारपणे परिपत्रक काढणाऱ्या अधिकाऱ्यांना वरिष्ठांनी समज द्यावी. असा इशाराही बरगे यांनी दिला आहे.

## रेल्वेच्या रुळावर अडकलेल्या माणसाला वाचवण्यासाठी नवी मुंबईकरांनी ढकलला लोकल रेल्वेचा डबा

■ **नवी मुंबई भावना जैन ,**

वाशी रेल्वे स्टेशनवर प्रवासी लोकल ट्रेनला धक्का देताना दिसत आहे. आतापर्यंत आपण दुचाकी, चारचाकी किंवा मोठ्या गाड्यांनी धक्का दिल्याच्या घटना ऐकल्या आहेत. नवी मुंबईत पहिल्यांदाच ट्रेनला धक्का दिल्याची घटना घडली आहे. प्रवाशांनी रेल्वेला धक्का का दिला, हे आपण जाणून घेऊ या. वाशी स्टेशनवर प्रवाशांनी खाली रेल्वे रूळावर अडकलेल्या माणसाला वाचवण्यासाठी लोकल ट्रेनच्या डब्याला धक्का दिला आहे. ही घटना एका व्यक्तीने आपल्या कॅमेऱ्यात कैद केली आहे. ही घटना बुधवारी घडली आहे. हा व्हिडिओ वाशी स्थानकावरील आहे. व्हिडिओमध्ये लोकल ट्रेनच्या मोटरमन केबिनजवळ लोकांचा एक गट जमलेला दिसत आहे. तर, दुसरा मोठा गट एका प्रवाशाला वाचवण्याचा प्रयत्न करत जड रेल्वे कोचला बाजूला ढकलताना दिसत आहे. बुधवारी दुपारी वाशी रेल्वे स्थानकावर प्रवाशांच्या एकतेचं कृत्य दाखवणारा



व्हिडिओ इंटरनेटवर समोर आला आहे. ट्रेनखाली अडकलेल्या दुसऱ्या सहप्रवाशाची सुटका करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न केला आहे. तिथे असलेल्या प्रवाशांनी लोकल ट्रेनला धक्का दिल्याचं धाडसी कृत्य व्हिडिओमध्ये दिसत आहे. भारतीय रेल्वे विभागाने अहवालाद्वारे या घटनेची माहिती दिली आहे. तो माणूस रेल्वे रूळावर कसा अडकला, याची चौकशी केली आहे. तसंच प्रवाशांनी स्वतःच्या सुरक्षिततेसाठी आणि रेल्वे स्थानकांवर फूटओव्हर ब्रिज आणि अंडरपासचा वापर करण्याचा इशारा दिला आहे. प्रवाशांना सुरक्षितता बाळगण्याचं आवाहन केलं आहे. रेल्वे स्टेशनवर नेहमीच विचित्र प्रकार घडत असतात. गोंधळ, रेल्वेत होणारी प्रवाशांची भांडणे हा तर नेहमीचाच विषय झाला आहे.





संपादकीय

# आयोगिक अपरिहार्यता




निवडणूक आयोगाचे कौतुक करावे तितके थोडेच. हा आयोग काय किंवा महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर काय! या दोघांनी जराही अपेक्षाभंग केला नाही. आयोगाचा आधीचा एकनाथ शिंदे यांची शिवसेना अधिकृत ठरवण्याचा निर्णय असो, नार्वेकरांचा शिवसेना फुटीसंदर्भात सर्वांनाच पात्र ठरवण्याचा निर्णय असो किंवा निवडणूक आयोगाचा अजित पवार यांच्या राष्ट्रवादीस घड्याळ देण्याचा निर्णय असो सगळे कसे अपेक्षेनुसारच घडले. या दोघांनीही जे काही केले त्यापेक्षा वेगळे काही केले नसते याबाबत कोणाच्याही मनात तिळमात्र शंका नव्हती. तसे काही वेगळे करण्याची संबंधितांची शामत असती तर ते करणारे ज्या ठिकाणी आहेत त्या ठिकाणी असतेच ना. तेव्हा जे काही झाले त्याबाबत अजिबात धक्का, आश्चर्य, खेद इत्यादी काही भावना व्यक्त करण्याची गरज नाही. त्याचबरोबर शिवसेना वा राष्ट्रवादी पक्ष यांचे आता काय होईल याबाबतही चर्चा करण्याची गरज नाही. त्या पक्षांचे अनुक्रमे उद्धव ठाकरे आणि शरद पवार हे काय ते पाहून घेतील. पण या निमित्ताने आपल्याकडच्या घटनात्मक इत्यादी म्हणवून घेणाऱ्या यंत्रणा किती केविलवाण्या विनोदी होऊ लागल्या आहेत याची चर्चा जरूर व्हायला हवी. नुसते विनोदी हे हास्यकारक आणि आनंददायी असते. केविलवाण्या विनोदात ते करणाऱ्याविषयी सहानुभूतीचा उमाळा येतो आणि तो करणाऱ्याविषयी ह्याकाय वेळआली आहे बिचाऱ्यावर असे वाटू लागते. सद्याःस्थितीत आयोगाबाबत असे का म्हणावे लागते, ते लक्षात घ्यावे लागेल. कारण निवडणूक चंडीगड शहरापुरतीच का असेना, जो कोणी निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहतो-मग तो राज्य निवडणूक आयोग असो वा केंद्रीय-त्यास दिल्लीश्वराची इच्छा पुरविण्याखेरीज काही पर्याय नसतो. या संदर्भात महाराष्ट्राचे उदाहरणही देता येईल. विधानसभा आणि लोकसभा यांच्या पोटनिवडणुका घ्याव्या लागू नयेत यासाठी त्यास प्रयत्नांची किती शिकस्त करावी लागली. अखेर उच्च न्यायालयास आयोगाच्या नाकर्तेपणाची दखल घ्यावी लागली. पुणे लोकसभा पोटनिवडणुकीत भाजपचा उमेदवार पराभूत झाल्यापासून निवडणूक आयोगाने महाराष्ट्रात पोटनिवडणुकांचा धसकाच घेतला असावा. आणि अशी निवडणूक घेतली, तीत भाजपचा पराभव झाला, त्याचा वाईट संदेश गेला तर न जाणो आपल्यावर बालंट यायचे अशी काही भीती आयोगाच्या मनात आहे किंवा काय ते माहीत नाही. पण या राज्यात त्यानंतर काही पोटनिवडणूक झाली नाही, हे खरे. इतकेच काय यामुळे राज्य निवडणूक यंत्रणांसही राज्यातील २०० हून अधिक पालिका आणि दोन डझनांहून अधिक महापालिका यांच्या निवडणुका टाळण्यासाठी प्रेरणा मिळाली नसेलच असे नाही. लोकसभा निवडणुकांआधी या निवडणुका झाल्या आणि त्यात जनतेने भलत्याच (पक्षीः भाजपेतर) पक्षास कौल दिला तर ते आपल्यावर शेकायचे असे काहींस वाटले असणार. तेव्हा निवडणुका घेणाऱ्या यंत्रणांपुढील परिस्थिती किती खडतर आहे हे यावरून लक्षात यावे. ते लक्षात आल्यास अजित पवारांबाबत निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्णयाचा अर्थ लावणे अत्यंत सुलभ होईल. कारण त्यात अर्थ लावावा असे काहीही नाही. राजकीय पक्षांचे व्यवहार पारदर्शी असायला हवेत, अशा अर्थाचे मत आयोग या निवाड्यानंतर व्यक्त करते. उत्तम विचार. पण तो शालेय स्तरावरील ह्यभारत माझा देश आहे,या प्रतिज्ञेतील सदिच्छेप्रमाणे निरुपयोगी ठरतो. असे विचार अमलात आणण्यासाठी जीवनावश्यक असा पाठीचा कणा सरळ नसेल तर सदिच्छेस काडीचाही अर्थ रहात नाही. म्हणजे निवडणूक रोख्यांसंदर्भातही पारदर्शीपणा असायला हवा असा आग्रह तर सोडाच, पण अनौपचारिक मत व्यक्त करण्याची हिंमत जरी निवडणूक आयोगाने दाखवली असती तरी त्याच्या राजकीय पक्षांबाबतच्या मतास गांभीर्याने घेता आले असते. याचप्रमाणे विधिमंडळ पक्षातील बहुमत हे पक्ष संघटनेपेक्षा निर्णायक असे निवडणूक आयोग म्हणतो. विधिमंडळ वा संसद यातील उलाढाल ही विधानसभाध्यक्ष वा सभापती यांची कार्यकक्षा. त्यात नाक खुपसण्याचे अधिकार आयोगास दिले कोणी? ''राष्ट्रवादी पक्षाचे कामकाज अत्यंत बेकायदेशीरपणे सुरू होते'' अशा प्रकारचा आरोप निवडणूक आयोगासमोरील अर्जात आहे आणि त्यास पवार यांनी केलेल्या पक्षातील 'नियुक्त्यां'चा संदर्भ आहे. हा आरोप ठीक. पण मग इतके दिवस पवार काका विविध पदांवर आपल्या पुतण्याच्या नेमणुका करत होते, त्यांचे काय? त्यास या पुतण्याने कधी विरोध केल्याचा इतिहास नाही. जे फुकट मिळाले ते घ्यायचे आणि अधिक मिळाले नाही की वाटप अन्याय्य असल्याचे रडायचे, हे अजितदादांसच शोभते. पण निवडणूक आयोगास हे स्वीकारावे लागते यातून केवळ आयोगाची अपरिहार्यताच लक्षात येते. आपल्या आदेशाच्या मुद्दा क्रमांक ३९ मधे निवडणूक आयोग राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात दोन गट असल्याचे नमूद करतो आणि पुढे पक्षात फूट पडल्याचा शब्दप्रयोगही केला जातो. तसे असेल तर मग घटनेच्या १० व्या परिशिष्टाप्रमाणे पक्षांतरबंदी कायद्याचे काय? कायद्यानुसार फूट झालेला गट हा दुसऱ्या कोणत्या पक्षात विलीन व्हायला हवा. येथे तसे झालेले नाही. तेव्हा पक्षाच्या वैधतेविषयी निर्णय देताना निवडणुका घेणारी सर्वोच्च यंत्रणा म्हणून आयोगाने पक्षांतर बंदी कायदा, संभाव्य अपात्रता यांचा विचार करायला नको? की ही मंडळी अपात्र होणारच नाहीत याची आयोगास खात्री आहे? आणखी मौजेचा मुद्दा असा की आपण स्वतः दिलेला आदेश आयोग मागे घेणार नाही, संबंधितांनी त्या विरोधात न्यायिक मार्ग शोधावा असे निवडणूक आयोग स्वतःच्याच आदेशात म्हणतो. हा मुद्दा आहे १४ सप्टेंबर (२३) या दिवशी आयोगाने राष्ट्रवादीत फूट पडली असल्याचे पत्र संबंधितांस पाठवल्याचा. हे पत्र एकतर्फी होते आणि त्याचा पुनर्विचार व्हायला हवा, अशी शरद पवार गटाची मागणी आहे. स्वतःच्या आदेशाचा पुनर्विचार करण्याचा न्यायिक अधिकार आयोगास नाही, असे निवडणूक आयोग म्हणतो. ही बाब तशी मनोरंजक म्हणायची. पण त्यावरही कहर म्हणजे आपल्या या पत्रास उभय गटांनी आव्हान दिले नाही; सबब आपल्या पत्रातील निष्कर्ष योग्यच असल्याचे आयोग सूचित करतो. अजितदादा गटाने राष्ट्रवादीतील नेमणुकांच्या वैधतेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

# मा. मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !!!



**'कठीण समय येता कोण कामास येतो,**
**हाक देती जनता एकनाथ धावुनी येतो.'**



**तू न थकेगा कभी,**
**तू न रूकेगा कभी,**
**तू न मुडेगा कभी,**
**कर शपथ, कर शपथ, अग्निपथ..अग्निपथ !!!**

लेखकः श्री.रणवीरसिंह राजपूत.
सहकार्य : श्री. मंगेश चिवटे, ओ.एस.डी, मंत्रालय.

भारतीय राजकारणात अनेक नेत्यांना-राज्यकर्त्यांना आपल्या वाडावडिलांचा-पूर्वजांचा राजकीय वारसा प्राप्त झाला अन् त्यातून ते सत्तास्थानी विराजमान झालेत.परंतु मा.एकनाथजी त्याला अपवाद आहेत. त्यांनी आपल्या कार्यकर्तुत्वाने शून्यातून विश्व निर्माण करत नगरसेवक ते मुख्यमंत्री असा यशस्वी राजकीय प्रवास केला.हीच खरी त्यांच्या राजकारणातून समाजकारण करण्याची फलश्रुती आहे.त्यांच्या राजकीय कारकिर्दीतील सर्वात उल्लेखनीय गोष्ट म्हणजे कोरोना काळात त्यांनी लोकनेत्याच्या भूमिकेतून तनमनधनाने रुग्णसेवा करत जीवाची बाजी मारून राज्यातील लाखो लोकांचे प्राण वाचविले. अशा धैर्यशाली रुग्णदुतास राज्याचा मुख्यमंत्री होण्याचा मान मिळाला,ही ठाणेकरांच्या दृष्टीने मोठ्या भाग्याची गोष्ट आहे.'आमचा घरचा माणूस मुख्यमंत्री झाला',अशी मानसिकता ठाणेकरांची झाली.महत्वाचं म्हणजे बाळासाहेबांनी रक्ताचं पाणी करून उभ्या केलेल्या शिवसेनेला मजबूत करण्यासाठी शिंदेसाहेब हे गेल्या चार दशकांपासून हिंदुत्वाशी नाळ अटूट ठेवत निष्ठापूर्वक काम करत आहेत.त्याचं फलित म्हणून त्यांना मुख्यमंत्री पद मिळालं,असे म्हणणे योग्य ठरेल.

शिवरायांच्या महाराष्ट्रातील मराठ्यांचा सात दशकापासून प्रलंबित पडलेला आरक्षणाचा प्रश्न अखेर सातारच्या शिंदे घराण्यातील संभाजीरावांचे सुपुत्र मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांच्या प्रामाणिक प्रयत्नांतून मार्गी लागला.त्यामुळे राज्यात सर्वदूर मराठा समाजाच्या सदस्यांनी हर्षोल्हासात गुलाल उधळत विजयश्री साजरी केली.तसेच त्यांनी शिंदे सरकारला कोटी कोटी धन्यवाद दिले.गेल्या सात दशकात राज्यात मराठा समाजाचे अनेक मुख्यमंत्री झाले,परंतु त्यातील एकानेही मराठा आरक्षणाचा प्रश्न सोडविण्यात रस दाखविला नाही.परंतु मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे त्याला अपवाद ठरले अन् त्यांनी हे आरक्षण अवघ्या दीड वर्षाच्या कारकिर्दीत मिळवून दिले.चला तर करूया...शिवछत्रपतींना त्रिवार मानाचा मुजरा !

सर्वसामान्य माणसाची सेवा करण्याचा ध्यास घेतलेल्या भाईंनी आपल्यावर कोसळलेल्या दोन लेकरांच्या आकस्मिक दुःखाचा डोंगर बाजूला सारून केवळ ठाणे च नव्हे तर, सारा महाराष्ट्र हेच माझं कुटुंब मानून, शिंदेसाहेबांनी राज्याच्या सर्वांगीण विकासासाठी समर्पित भावनेने लोकहिताची कामे करण्यास स्वतःला झोकून घेतलं.'आधी करून दाखवायचं नंतर बोलायचं' ही भूमिका स्वीकारून त्यांनी आपली राजकारणातून समाजकारणकडे वाटचाल सुरू केली.आई जगदंबे,भाईंना रुग्णसेवेसाठी उदंड आयुष्य देवो, अशी चरणी प्रार्थना !

शिवछत्रपतींच्या साताऱ्याच्या जन्मभूमीची माती ललाटी लावून शून्यातून विश्व निर्माण करण्याचं स्वप्न साकारण्यास ठाणे या सांस्कृतिक नगरीत शिंदेसाहेबांनी पदार्पण केलं अन त्यांच्या जीवनाला मोठी कलाटणी मिळाली.शिवसेनाप्रमुख वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जहाल,परखड अन ओजस्वी वाणीनं प्रेरित होऊन,तर धर्मवीर आनंद दिघेसाहेब यांच्या शिकवणीने वयाच्या अवघ्या २० व्या वर्षीच त्यांनी शिवसेनेच्या हिंदुत्वाचा भगवा ध्वज हाती घेतला आणि बघता-बघता त्यांचं राजकीय,सामाजिक व आध्यात्मिक जीवन भगवामय झालं. 'क्षत्रिय मराठा बाणा' जपून रुग्णसेवेसाठी आपला जीव पणाला लावणाऱ्या लोकनेत्याचा जन्म ९ फेब्रुवारी १९६४ रोजी सातारा जिल्ह्यातील जावळी क्षेत्रातील दरे या छोट्याश्या गावी आई गंगूबाई संभाजीराव यांच्या उदरी झाला.अन महाराष्ट्रात हिंदुत्वाची ज्योत तेजोमय करण्यासाठी जणू तो सूयार्वांनी उदयास आला.

सातारा जिल्ह्यातील रहिवासी असलेले श्रीमान संभाजीराव नवलू शिंदे यांची आर्थिक परिस्थिती बेताची होती. या पार्श्वभूमीवर साऱ्या कुटुंबियांसह ठाणे येथे स्थायिक होऊन भाईंनी उदरनिर्वाहसाठी रिक्षाचालक म्हणून जीवनाची सुरुवात केली.त्यानंतर आपल्या कठोर परिश्रम,निष्ठा,प्रामाणिकपणा व नेतृत्वगुणाच्या जोरावर रिक्षाचालकांची मने जिंकून त्यांनी ठाणे रिक्षा युनियनचे अध्यक्षपद भूषविलं.मात्र त्याआधी त्यांनी आपलं प्राथमिक शिक्षण किसननगर येथील महापालिकेच्या शाळा न.३ मध्ये,तर माध्यमिक शिक्षण कोपरी-ठाणे येथील मंगला विद्यालयात पूर्ण केलं.त्यानंतर मात्र त्यांचं पुढील शिक्षण आर्थिक विवंचनेमुळे खंडित झालं.तथापि,त्यामागील मुख्य कारण होतं,ते म्हणजे श्रीकांतदादांचं डॉक्टर होऊन गोरगरिबांची आरोग्य सेवा करण्याचं स्वप्न साकार करण्याचं.असं असूनही त्यांनी पुढील शिक्षण घेण्याची जिद्द व दुर्दम्य इच्छा मात्र आपल्या मनात कायम जिवंत ठेवली.कालांतराने त्यांनी कोरोनाशी लढा देत असताना आपल्या जिद्द व अभ्यासूवृत्तीच्या बळावर आपले ग्रॅज्युएशन पूर्ण केले. काहीही होवो,कुठल्याही परिस्थितीत मागे हटायचं नाही,हा त्यांच्या स्वभावातील जणू स्थायीभावच! कारण जेथे संकट तेथे अनाथांचे नाथ एकनाथ हे हजर आहेतच,असे गृहीत धरा.मग वादळ असो वा अतिवृष्टी;रस्त्यावरील अपघाताची घटना असो वा इमारत दुर्घटना; किंवा एखाद्या गोरगरीब निर्धन रुग्णाला अर्थसहाय्यची निकड.....अशा व अन्य संकटकाळाच्या वेळी मदतीचा हात देण्यास लोकनाथ प्रगट झालेच समजा.आहो..इतकेच काय,जगाला हादरून सोडणाऱ्या कोरोनाने देखील एकनाथांना घाबरून महाराष्ट्रातून धूम ठोकली होती,हे राज्यातील सर्वधर्मीय लोकांनी प्रत्यक्ष अनुभवले. हाच खरा भाईंचा राजकारणातून समाजकारण करण्याचा करिश्मा आहे.

दरम्यान आपल्या सामाजिक कार्य करण्याच्या आवडीने अन् कठोर परिश्रमाने त्यांनी दिघेसाहेबांचा विश्वास संपादन केला.त्यातून पुढे त्यांना शाखा प्रमुख होण्याची संधी दिली.त्या पदास देखील त्यांनी न्याय दिला.तेथेही भाईंनी शिवसेनेसाठी रात्रंदिवस निष्ठेने काम करून वंदनीय बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघेसाहेब यांची मने जिंकली,अन तेथूनच त्यांच्या भाग्याची कवाडं उघडलीत.परंतु दुर्दैवानं एक काळा दिवस उजाडला.अन २६ ऑगस्ट २००१ रोजी दिघेसाहेबांचा दुर्दैवाने अपघाती मृत्यू होऊन ठाणेकरांवर दुःखाची अवकळा पसरली.संपूर्ण ठाणे शहर सुन्न झालं होतं.प्रत्येकाला आपल्या घरातील थोरली व्यक्ती गेल्याचे दुःख झालं.त्यानंतर शिवसेनाप्रमुखांनी ठाणे जिल्हा प्रमुखाची जबाबदारी शिंदेसाहेबांना सोपविली. शिवसेना ठाणे जिल्हा प्रमुख पदाचं उत्तरदायित्व यांच्या हाती आलं.सर्वांना बरोबर घेऊन आत्मविश्वासाने कार्य करत स्व.दिघेसाहेबांचे पवित्र पद आजमितीपर्यंत त्यांनी समर्थपणे सांभाळले,याचा ठाणेकरांना सार्थ अभिमान आहे.मुख्यमंत्री झाल्यावर त्यांना हे पद माजी महापौर श्री.नरेश म्हस्के यांना सोपविले.शिंदेसाहेबांच्या लोकप्रियतेचा आलेख असाच पुढे सरकत गेला.त्याचाच एक भाग म्हणून बाळासाहेब ठाकरे यांनी २००४ च्या सार्वत्रिक निवडणुकीत कोपरी-पाचपाखाडी विधानसभेची निवडणूक लढण्याची भाईंना संधी दिली.त्या संधीचं सोनं करून त्यांनी या क्षेत्रात मोठ्या मताधिक्याने विजयश्री संपादन केली.खरं तर,त्यांच्या समाजोपयोगी कामांची ही पावतीच आहे,असे म्हणणे संयुक्तिक ठरेल. मित्रहो, महाविकास आघाडी सरकारच्या काळात दुर्लक्षित होऊन बंद पडलेलं मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी पुनश्च सुरू करून राज्यातील गोरगरीब,निर्धन,गरजू लोकांना वैद्यकीय मदत देण्यासाठी पुढाकार घेतला. अन गेल्या दीड वर्षात राज्यातील सुमारे १९००० हून अधिक दूर्भर आजारांच्या रुग्णांना १५६ कोटी रुपयांचे अर्थसहाय्य उपलब्ध करून दिलं,हा उच्चांक वैद्यकीय क्षेत्रासाठी मैलाचा दगड ठरला आहे,असे म्हणणे संयुक्तिक ठरेल.या महत्वपूर्ण कामासाठी मुख्यमंत्र्यांनी मंगेश चिवटेसारख्या उच्च विद्याविभूषित,धाडसी कार्यतत्पर अन कर्तव्यदक्ष रुग्णसेवकाची मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष प्रमुख म्हणून नियुक्ती केली.त्याची परिणती म्हणजे सदर कक्षाच्या कामकाजाला मोठ्या प्रमाणात गती प्राप्त होऊन गोरगरीब लोकांचे महागडे ऑपरेशन्स मोफत होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष आपल्या दारात हा नाविन्यपूर्ण उपक्रमाचा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गेल्या वाढदिवशी ९ फेब्रुवारी २०२२ रोजी शुभारंभ झाला. या उपक्रमाव्दारे मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष अन् त्या अंतर्गत येणाऱ्या विविध आरोग्यविषयक योजनांची माहिती राज्यातील गरजू लोकांपर्यंत पोहोचविली जात आहे. गोरगरिबांचे हित हेच आमचे ब्रीद या आधारावर जिल्ह्या-जिल्ह्यात दौरे केले जात आहेत. राज्यातल्या गोरगरिबांचे प्रश्न सोडविण्यासाठी मुख्यमंत्र्यांचे दालन रात्री १० वाजेपर्यंत चालू ठेवण्याचा शिंदेसाहेबांनी निर्णय घेतला. त्यामुळे राज्यातील आर्थिकदृष्ट्या कमकुवत घटकांचे आरोग्य व अन्य तत्सम प्रश्न जलदगतीने सुटू लागले आहेत.या पार्श्वभूमीवरच शिंदेसाहेबांना सर्वधर्मीय जनता लोकहितवादी नेता म्हणून संबोधित असते. शिंदेसाहेब हे ठाणे जिल्ह्यातील सर्वधर्मीय लोकांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांना मार्गी लावण्यासाठी सातत्याने कार्यरत राहिले आहेत.त्यांच्या सामाजिक कार्यांची जनमानसावर छाप पडून त्यांनी २००४ च्या विधानसभा निवडणुकीनंतर २००९,२०१४ अन १०१९ या विधानसभा निवडणुकींमध्येही विरोधी पक्षांच्या उमेदवारांचा दारुण पराभव करुन भाईंनी ठाणे जिल्ह्यात आपला दबदबा कायम ठेवला. कारण ते मुळातच राजकारणातून समाजकारण करण्यावर भर देत आले आहेत,हे सर्वज्ञात आहे. धर्मवीर आनंद दिघेसाहेब यांच्या पश्चात ठाणे जिल्ह्याची शिवसेना सावरून भाईंनी पुन्हा भक्कम पायावर उभी केली. शाखा प्रमुख,नगरसेवक,आमदार,ठाणे जिल्हा प्रमुख अन कॅबिनेट मंत्री आणि आता मुख्यमंत्री असा त्यांचा यशस्वी राजकीय प्रवास आजच्या तरुण पिढीला प्रेरणादायी ठरणारा आहे. वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांनी निष्ठावान शिवसैनिकाने राज्याचे मुख्यमंत्री व्हावे,हे स्वप्न पाहिलं होतं. ते स्वप्न ज्येष्ठ शिवसैनिक एकनाथजी शिंदे यांच्या माध्यमातून पूर्ण झालं,याचा राज्यातील तमाम शिवप्रेमींना सार्थ अभिमान आहे. साहेब,तुमच्या हातून राज्याचे वैभव द्विगुणित होवो आपणास पुढील यशस्वी वाटचालीसाठी भगव्या शुभेच्छा ! जय हिंद ! जय महाराष्ट्र !

# Mumbai ragpicker held for killing 70-year-old woman for money



**Mumbai:** A Mumbai ragpicker was arrested for allegedly killing a 70-year-old woman to loot about Rs 3,000 that she had saved up in Mumbai's Kandivali area on Wednesday, an official said, reported news agency PTI. In the early hours of Wednesday, the Mumbai ragpicker fatally attacked the elderly woman with a stone and ran away with her cash, which was about Rs 3,000, the official said, reported PTI. After being alerted about the crime, the police launched a probe and arrested Sheikh. He has been booked for murder, the official added, reported PTI. In another case, the Navi Mumbai police have registered a murder case against a 27-year-old man in connection with the discovery of a body from the water tank of a dilapidated building recently, an official said, reported PTI. Uranresident Sayarali Jalil Sheikh was booked on Wednesday under IPC section 302 on the complaint of the brother of victim Imdadul Pachu Sheikh (35), he said, reported PTI. Citing the FIR, the official said that a friend of the accused had sought refuge at the victim's place for a brief respite. Sayarali was apparently furious when Imadul asked his friend to leave his room, reported PTI. mber 21 last year, Sayarali allegedly fatally attacked Imadul and hid the body in an empty water tank of a dilapidated building at Chirle near Uran, reported PTI. The police initially registered an accidental death report, but upgraded it to a murder investigation following the autopsy report and a complaint by Imadul's brother, the official said, reported PTI. Meanwhile, a partially decomposed body of an unidentified man was found on a beach in Gorai here on Tuesday, police said, reported PTI. The body was spotted by a passerby at Kudven beach in Gorai in the morning, an official said, reported PTI. The man appears to be in his 40s, and while nothing was recovered from his clothes, he was wearing a smartwatch, which might help ascertain his identity, he said.


# कोल्हापूरच्या सुपुत्राची युनायटेड किंग्डम सरकारच्या विशेष सल्लागारपदी नियुक्ती



■ **कोल्हापूर। प्रतिनिधी,**
कोल्हापूर जिल्ह्यातील अर्जुनवाड गावचा सुपुत्र, युवा कृषी धोरणकर्ता व संशोधक विनायक हेगाणा याची युनायटेड किंग्डम सरकारच्या आरोग्य व ग्रामीण विकास मंत्रालयाच्या विशेष सल्लागारपदी नियुक्ती करण्यात आली आहे.

या जबाबदारीवर काम करणारे विनायक हेगाणा हे देशातील पहिले कृषी पदवीधर संशोधक ठरले आहेत. स्वान्सी विद्यापीठाच्या संशोधक व संचालक डॉ. इमा फारसन या सल्लागार गटाचे नेतृत्व करत आहेत. या सल्लागार मंडळाच्या माध्यमातून विनायक हे विशेष प्रतिनिधी म्हणूनही समन्वय करतील. काही महिन्यांपूर्वीच हेगाणा यांना ब्रिटिश सरकारच्या चेव्हनिग ग्लोबल लीडर या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. जागतिक नामांकित विद्यापीठामध्ये संशोधन विषयक अभ्यास करत असताना हेगाणा यांना युनायटेड किंग्डम मधील शेतकरी व ग्रामीण भागातील अभ्यासातून विविध प्रकारची माहिती मिळाली. हेगाणा यांच्या ग्रामीण मानसिक आरोग्य विषयक संशोधन कामाची दखल घेऊन युनायटेड किंग्डम मधील ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी धोरण निर्मिती व सल्ला या महत्त्वपूर्ण कामाची जबाबदारी त्यांना देण्यात आली आहे. हेगाणा यांचे शेतकरी आत्महत्या शोध आणि बोध हे पुस्तक शिवारात काम करणारा कार्यकर्ता ते लेखक या भूमिकेतून प्रकाशित झाले आहे.

# Boat from Kuwait illegally reaches Mumbai, raises security concerns




**Mumbai:** Three people illegally reached Mumbai's coastal limits via the sea route from Kuwait in a boat, raising questions about coastal security. Sources informed that during the Mumbai 26/11 attacks, Mumbai 26/11 attacks, terrorists also utilised the sea route. According to the police, on Tuesday morning at around 7:30 am, the boat Sumaram Chaitrali, while conducting routine marine patrol from Gateway of India to the Light House area, noticed a boat of a different make moving suspiciously in front of Sassoon Dock in the Sank Rock area. A Mumbai police team took immediate action and stopped the boat, which was later identified as belonging to Kuwait, named Abdula Sharif 1. "There were three persons in the boat identified as Nitso Ditto, 31, Infant Vijay Vinay Anthony, 29, and J. Sahayanta Anish, 29, all three into fishing and based in Tamil Nadu. Since the said boat had entered Indian waters without a license and was within the limits of the police station of Colaba, the police officer on duty on the Chaitrali boat contacted the South Control Room, and the boat and its occupants were handed over to Colaba police. Further investigation regarding the boat is ongoing at Colaba Police Station," said a police officer. As the coastal area falls under the jurisdiction of the Yellow Gate police station, they began the investigation and found that the three individuals are residents of the state of Tamil Nadu and are Indian citizens. "All three were sent to Kuwait two years ago by an agent from Tamil Nadu named Captain Madan for work. They traveled from Trivandrum to Kuwait by air route. They started working as fishermen in Kuwait for the last two years on Abdula Sharif's boat named Abdula Sharif 1.

# आई-वडिलांना सांभाळाल, तरच मिळेल मालमत्तेवर वारसा हक्क ; अन्यथा शासनाच्या योजनेपासून वंचित ठेवण्याचा येरगी ग्रामपंचायतचा जिल्ह्यात पहिला निर्णय

■ **देगलूर। प्रतिनिधी,**
आई- वडिलांचा सांभाळ न करणाऱ्या पाल्यांना शासकीय योजनेपासून वंचित ठेवून त्यांच्या स्थावर मालमत्तेवर वारस न लावण्याचा निर्णय येरगी ग्रामपंचायतीने नुकताच घेतला आहे. या निर्णयाचे सर्व गावकऱ्यांतून स्वागत केले जात आहे.देशामध्ये एकीकडे प्रगतीचे वेगवेगळे क्षेत्र विकसित होत असताना ज्यांनी आपल्याला हे जग दाखवले अशा माता पित्यांनाच वृद्धत्व काळामध्ये घरातून हाकलून देण्याच्या प्रकारात वरचेवर वाढ होत आहे. ग्रामीण भागही याबाबतीत मागे राहिलेला नाही. हे अनेकदा दिसून येत आहे. या व अशा अनुषंगाने अनेक तक्रारी ग्रामपंचायत येरगीकडे नागरिकांनी केल्या होत्या. तक्रारी प्राप्त झाल्याने व त्यात काही तथ्य दिसून येत असल्याने सरपंच संतोष पाटील यांनी हा विषय ग्रामसभेत मांडण्याचा निर्णय घेतला. त्या अनुषंगाने ग्रामपंचायतची विशेष सभा प्रजासत्ताकदिनी बोलावून त्या सभेत हा विषय त्यांनी मांडला. या विषयाला ग्रामसभेने एकमुखाने मंजुरी दिली. असा निर्णय घेणारी तालुक्यातील ही पहिलीच ग्रामपंचायत असून जिल्ह्यातील एकही ग्रामपंचायतने अद्याप असा निर्णय घेतलेला नाही. नव्या पिढीतील अनेक तरुण विद्येचे अनेक उदाहरणे पार करीत असून अनेकांनी स्वतः समुद्रापारही आपल्या ज्ञानाचा ठसा उमटवला असला तरी आई-वडिलांचा सांभाळ करण्यास टाळाटाळ केली जाते. हे वास्तव वरचेवर धुसरपणे पुढे येत आहे. आई-वडिलांना स्वतःच्याच घरातून बाहेर काढण्यात येत असल्याने वृद्धाश्रमांची संख्या समाजात वरचेवर वाढत झालेली आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीने हा ठराव मंजूर केला असल्याची प्रतिक्रिया सरपंच प्रतिनिधी संतोष पाटील यांनी बोलताना दिली. यावेळी सरपंच संतोष पाटील, ग्रामविकास अधिकारी राजेश तोटावाड, ग्राम पंचायत सदस्य, विश्वनाथ बागेवार, अशोक वाघमारे, मारोती तलरवार, अशोक बरसमवार, सुरेश सोमावार, गजानन सूर्यवंशी, तटामुक्ती अध्यक्ष गगांधर बरसमवार यांच्यासह गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# घर फोडून 19 तोळे सोने लंपास




■ **नाशिक। प्रतिनिधी,**
सातपूर कॉलनीत चोरट्यांनी घरात ठेवलेले १९ तोळे सोन्या-चांदीचे दागिने पळवून नेले आहेत. माहिती मिळताच सातपूर पोलिस घटनास्थळी दाखल झाले. पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी करत श्वान पथकास घटनास्थळावरून पुरावे सापडण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहे. रमेश नामदेव महाले यांच्या घरात चोरट्यांनी घरफोडी केली. संपूर्ण कुटुंब गावाला गेले होते. याचदरम्यान १९ तोळे सोन्या-चांदीचे दागिने व यासोबतच घरातील कपाटात ठेवलेली दोन लाख रुपयांची रोकडही चोरट्यांनी लंपास केली आहे.याप्रकरणी सातपूर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आली आहे. पुढील तपास सातपूर पोलिस करत आहेत.

# करवाढ नसलेल्या अर्थसंकल्पाची शक्यता; नवी मुंबई महापालिकेच्या ठेवी १,३८४ कोटींवरून १,५०० कोटींवर जाणार

**नवी मुंबई। प्रतिनिधी,**

नवी मुंबई महानगरपालिकेचा अर्थसंकल्प पुढील काही दिवसांत सादर होणार आहे. आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कोणतीही करवाढ नसलेलाच अर्थसंकल्प सादर होणार असल्याची शक्यता असून यावर्षी मात्र गेल्या वर्षीच्या १,३८४ कोटींच्या ठेवींच्या तुलनेत यंदाच्या अर्थसंकल्पात ठेवींमध्ये वाढ होत या ठेवी १,५०० कोटी होणार आहेत. यंदाचा अर्थसंकल्पहा २० तारखेपर्यंत सादर करण्यात येईल अशी माहिती नवी मुंबई महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी दिली.

महापालिका आयुक्त व प्रशासक राजेश नार्वेकर अर्थसंकल्प सादर करणार असून या अर्थसंकल्पात अपूर्ण प्रकल्प पूर्ण करण्यावर व तर शहरासाठी पायाभूत सुविधा पुरवणारे नवे प्रकल्प या अर्थसंकल्पात सादर केले जाणार असल्याची खात्रीलायक माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.



अर्थसंकल्पाबाबत पालिका आयुक्तांनी नागरिकांकडूनही अपेक्षा मागवल्या आहेत. महापालिकेला प्राप्त झालेल्या नागरिकांच्या अपेक्षा संबंधित विभागांना पाठवण्यात आल्या आहेत.

२०२३-२४ या गेल्या वर्षी सादर करण्यात आलेल्या अर्थसंकल्पात ११४५.०३ कोटी आरंभीच्या शिलकीसह ४९२४ कोटी जमा व ४९२२.५० कोटी खचार्चे व २.५० कोटी शिलकीचा नवी मुंबई महापालिकेचे मूळ अर्थसंकल्पीय अंदाज सादर करण्यात आले होते. यावर्षीही शिलकीचा अर्थसंकल्पीय अंदाज सादर करण्यात येणार असून यावषीर्चा अर्थसंकल्प हा पाच हजार कोटींच्यावर जाणार का याची उत्सुकता आहे.

यंदा लोकसभा निवडणुकांमुळे करवाढ करणे कोणत्याच राजकीय पक्षाला परवडणारी नसल्याने यंदाचा अर्थसंकल्पही कोणतीही करवाढ नसलेलाच असण्याची शक्यता आहे. यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये काही ठराविक नवे प्रकल्पवगळता गतवर्षीच्या जुन्याच अर्थसंकल्पाला नवी झळाळी मिळण्याची शक्यता आहे.

अर्थसंकल्प सादर होण्याची तारीख अनिश्चित

शहरात सध्या सुरू असलेले प्रकल्प पूर्ण करण्यासाठीची तरतूद अशा बाबींचा अर्थसंकल्पात समावेश असेल. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेले व नव्या शैक्षणिक वर्षात तरी नवे वैद्यकीय महाविद्यालयाबरोबरच आरेग्यसुविधा अधिक सक्षम करण्यावर भर दिला जाणार असल्याचे चित्र आहे. महापालिकेचा अर्थसंकल्प सादर करण्यासाठी १४, १५, २० फेब्रुवारी यापैकी एक दिवस निश्चित केला जाण्याची दाट शक्यता आहे.

# 3 पोलीस अधिकाऱ्यांनी मागितली लाच; गुन्हा दाखल!

**मुंबई। प्रतिनिधी,**

पोलिसांच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने बोरिवली येथील एका महीलेकडून लाच स्वीकारल्याप्रकरणी 3 पोलिस अधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल केला आहे.तिघांनाही भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्या अंतर्गत आरोप असून याप्रकरणी अधिक तपास सुरु आहे. या तिन्ही पोलीस अधिकाऱ्यांना बोरिवली पोलीस ठाण्यात कार्यरत होते.



या तिघांपैकी एक सुधीर कालेकर वरिष्ठ पोलीस निरीक्षक पदावर कार्यरत आहेत. पोलीस निरीक्षक अरविंद घाग आणि पोलीस उप निरीक्षक स्वप्नाली मांडे हे अन्य 2 पोलीस अधिकारी आरोपी आहेत. तक्रारदार महिलेच्या म्हणण्यानुसार, तिच्या सासरच्याकडून स्त्रीधन परत मिळवून द्यायच्या आश्वासन देत आरोपी पोलीस अधिकाऱ्यांनी महिलेकडे 5 लाखांच्या लाचेची मागणी केली. महिलेने पोलीस अधिकाऱ्याला 2 लाख रुपये दिले. त्यानंतर या प्रकरणी न्यायालयात तक्रार दखल केली. न्यायालयीन सुनावणी पूर्ण झाल्यानंतर न्यायलयाने आरोपी पोलीस अधिकाऱ्यांवर गुन्हा नोंदवण्याचे आदेश दिले होते.

# जि. प. शेलवली बांगर शाळेच्या १५ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत सुयश




**ठाणे। प्रतिनिधी,**

राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी राज्य परीक्षा परिषद पुणेजर्फे आयोजित शिष्यवृत्ती योजना परीक्षेचा अंतिम निकाल आज घोषित झाला. त्यात शहापूर तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा शेलवली बांगर केंद्र अल्याणी येथील १५ विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश संपादन केले आहे. त्यात दोन आदिवासी कातकरी समाजाच्या विद्यार्थिनींही समावेश आहे. या शाळेचे तब्बल १७ विद्यार्थी या परीक्षेला बसले होते. त्यापैकी तब्बल १५ विद्याथी उत्तीण झाले आहेत. या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्यांमध्ये योगिता व्यापारी, मेघना बांगर, श्रेयस बांगर, मुस्कान शेख, शिवानीग बांगर, वेदांत बांगर, पार्थ धानके, जयदीप भोईर, करण बांगर, कुमुद निमसे, गणेश आगिवले, तन्वी मुकणे, तेजस बांगर, प्रथमेश भोईर आणि ज्योती मुकणे हे विद्यार्थी शिष्यवृत्ती परिक्षा उत्तीर्ण झाले आहेत. गटशिक्षणाधिकारी. भाऊसाहेब चव्हाण, विस्ताराधिकारी संगीता माळी, केंद्रप्रमुख डॉ. राजेंद्र चौधरी, मुख्याध्यापक बाळू धानके, वर्गशिक्षक सुधाकर पाटील यांनी ऑनलाइन व ऑफलाइन पद्धतीने केलेले मार्गदर्शन हिताचे ठरले आहे. याशिवाय शाळेतील हरी गावंडा, रेखा पाटील, रामदास बांगर, काशिनाथ शिंदे, महेश तारमळे आदी शिक्षकांचे वेळोवेळी मिळालेले मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष भरतभाऊ बांगर आणि सर्व सदस्यांनी अभिनंदन केले आहे.

# एन्काऊंटर स्पेशलिस्ट प्रदीप शर्मांच्या घरी प्राप्तिकर विभागाचा छापा

**मुंबई। प्रतिनिधी,**

एन्काऊंटर स्पेशलिस्ट प्रदीप शर्मांच्या घरी प्राप्तिकर विभागाने छापा टाकल्याची माहिती समोर आली आहे. अचानक पडलेल्या या छाप्यामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. तर, एका माजी आमदाराच्या प्रकरणी ही कारवाई करण्यात आली असल्याची माहिती देण्यात आली आहे. सध्या प्रदीप शर्मा यांच्या घराची प्राप्तिकर विभागाच्या अधिका[illegible]यांकडून झाडाझडती करण्यात येत आहे. प्रदीप शर्मा हे मुंबई पोलीस दलातील माजी पोलीस अधिकारी आहेत. त्यांची एन्काउंटर स्पेशलिस्ट अशी ओळख बनलेली होती. प्रदीप शर्मा हे मनसुख हिरेन प्रकरणातील आरोपी आहेत. ते वर्षभरापासून अधिक काळ तुरुंगात होते.काही महिन्यांपूर्वीच प्रदीप शर्मा यांना सुप्रीम कोटार्तून जामीन मंजूर झाला आहे. त्यानंतर आता प्रदीप शर्मा यांच्या घरी प्राप्तिकर विभागाने टाकलेल्या छाप्यामुळे मोठी खळबळ उडाली आहे. सकाळी 7 वाजताच्या सुमारास प्राप्तिकर विभागाचे अधिकारी प्रदीप शर्मा यांच्या घरी दाखल झाले आहेत. परंतु, ही छापेमारी नेमक्या कोणत्या प्रकरणात करण्यात आली आहे, हे अद्यापही कळू शकलेले नाही. मात्र, एका माजी आमदाराशी संबंधित हे प्रकरण आहे. माजी आमदाराच्या प्रकरणाचा तपास प्राप्तिकर विभागाच्या अधिकाऱ्यांकडून केला जात आहे. ज्यामुळे शर्मांच्या मालमत्तेची पडताळणी केली जात आहे. त्याच अनुषंगाने प्रदीप शर्मा यांच्याशी त्या माजी आमदाराच्या प्रकरणाचा काही संबंध आहे का, अशा प्रकारे हा तपास करण्यात येत आहे. प्रदीप शर्मा यांच्या अंधेरी येथील घराची प्राप्तिकर विभागाच्या अधिकाऱ्यांकडून झडती घेण्यात येत आहे. सकाळी सात वाजताच्या सुमारास प्रदीप शर्मा यांच्या घरी प्राप्तिकर विभागाचे अधिकारी दाखल झाले.

# महिलांच्या डब्यांत पुरुष फेरीवाल्यांची घुसखोरी



**ठाणे । प्रतिनिधी,**

मध्य रेल्वेच्या उपनगरीय रेल्वेगाड्यांमध्ये महिलांना सुरक्षित प्रवास करता यावा यासाठी स्वतंत्र डबे आहेत. असे असतानाही रेल्वे प्रशासन आणि रेल्वे सुरक्षा दलाच्या (आरपीएफ) दुर्लक्षामुळे पुरुष फेरीवाल्यांची सर्रास या डब्यांमध्ये घुसखोरी सुरू आहे. या घुसखोरीमुळे महिला सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. तसेच फेरीवाल्यांसदर्भात अनेक तक्रारी करूनही रेल्वे प्रशासनाकडून ठोस कारवाई होत नसल्याच्या तक्रारी महिला प्रवाशांकडून केल्या जात आहे. मध्य रेल्वे मार्गावरून दररोज लाखो नोकरदार मुंबईत नोकरीनिमित्ताने प्रवास करत असतात. या प्रवाशांमध्ये पुरुषांप्रमाणे महिलांची संख्याही मोठ्याप्रमाणात आहे. उपनगरीय रेल्वेगाड्यांमध्ये महिला प्रवाशांसाठी एकूण तीन डबे उपलब्ध आहेत. या डब्यांमध्ये पुरुष प्रवाशांना प्रवेश बंदी आहे. तरीही महिला प्रवाशांबाबतीत अनेक गुन्हे घडल्याचे यापूर्वी समोर आले आहे. असे असतानाच, दुसरीकडे प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे खाद्य पदार्थ, महिलांच्या दररोजच्या वापराच्या वस्तू विक्री करणारे फेरीवाले महिला डब्यांमध्ये शिरत आहेत. या फेरीवाल्यांमध्ये पुरुष फेरीवाल्यांचे प्रमाणदेखील अधिक आहे. डब्यामध्ये महिलांची गर्दी असतानाही पुरुष फेरीवाले डब्यामध्ये शिरत असतात.

सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर काही महिला प्रवासी आणि संघटनांकडून या बाबत अनेकदा रेल्वे सुरक्षा दलाच्या अधिकाऱ्यांकडे समाजमाध्यमांवर तक्रारी केल्या जातात. परंतु या गंभीर समस्येकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे महिला प्रवाशांचे म्हणणे आहे. यासंदर्भात रेल्वे सुरक्षा दलाच्या अधिकाऱ्यांना विचारले असता, आम्ही विशेष कारवाई केल्या आहेत. तसेच यापुढेही कारवाई केली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. रेल्वेमध्ये महिलांच्या डब्यात मोठ्या प्रमाणावर पुरुष फेरीवाले आढळून येत आहेत. याबाबत वारंवार तक्रारी दिल्या आहेत. परंतु प्रशासनाकडून याबाबत कोणतीही ठोस कारवाई होताना दिसत नाही.

# लग्नानंतर आठ वर्षांनी गरोदर राहिलेल्या महिलेला पक्षाघाताचा झटका

## केईएमच्या डॉक्टरांनी अशी केली गुंतागुंतीची प्रसूती

**मुंबई। प्रतिनिधी,**

गर्भधारणा आणि प्रसूती काळातील गुंतागुंत अनेकदा गर्भवती महिलेच्या जीवावर बेतते. या काळात बऱ्याच प्रकरणांत गर्भवती महिलेच्या अनेक आरोग्य तक्रारी समोर येतात आणि डॉक्टरांसमोर मोठं आव्हान उभं राहतं. गभार्तील बाळ आणि गर्भवती महिलेचा जीव वाचवण्यासाठी डॉक्टर शर्थीचे प्रयत्न करतात. अनेकदा या प्रयत्नांना यश येतं तर अनेकदा हे प्रयत्न अपयशी ठरतात. असाच प्रकार मुंबईतील केईएम रुग्णालयात घडला आहे. गर्भवती महिलेला अचानक पक्षाघाताचा झटका आला. परंतु, या गुंतागुतींच्या आणि आव्हानात्मक परिस्थितीतही केईएम रुग्णालयातील डॉक्टरांनी बाळ



आणि बाळंतीणीचा जीव वाचवला आहे. माहिम येथे राहणाऱ्या एका ३१ वर्षीय गर्भवती महिलेला सकाळी अचानक जाणवलं की ती बेडवरून उठू शकत नाही. तिला एक शब्दही बोलता येत नव्हता. तिची ही अवस्था पाहून तिच्या पतीने तिला तत्काळ मुंबईतील के.ई.एम रुग्णालयात दाखल केलं. पक्षघाताचा झटका आला तेव्हा महिला आठ महिन्यांची गर्भवती होती. तिला रुग्णालयात दाखल करताच या जोडप्याला धक्का बसला. कारण या गर्भवती महिलेला पक्षघाताचा झटका आला होता. पक्षघाताचा झटका जगभरातील अपंगत्व आणि मृत्यूचं प्रमुख कारण आहे. परंतु, गर्भवती महिलांना पक्षघाताचा झटका सामान्यपणे संभवत नाही. त्यामुळे हे प्रकरण दुर्मिळ होतं. महिला गरोदर असल्याने पक्षघातासाठी असलेले वैद्यकीय उपचार तिला करता येणार नव्हते. कारण त्यामुळे तिच्या गर्भावर परिणाम होऊ शकला असता. एवढंच नव्हे तर लग्नाच्या आठ वर्षांनंतर ती गर्भवती राहिली होती. त्यामुळे या उपचारामध्ये मोठा धोका होता. गोल्डन अवर्समध्ये डॉक्टरांची शर्थ न्युरोइंटरव्हेंशनल रेडिओलॉजीच्या प्रमुख डॉ. रश्मी सराफ आणि त्यांची टीम जुन्या तंत्रावर अवलंबून होती. महिलेच्या मेंदूतील मध्य सेरेब्रल धमनी उघडण्यासाठी त्यांनी एक सामान्य स्टेंट वापरला, जो सामान्यतः हृदयाच्या धमन्यांमध्ये वापरला जातो. आम्ही गोल्डन अवर्समध्ये रक्त प्रवाह सुरळीत आणि महिलेच्या अर्धांगवायू झालेल्या उजव्या बाजूचे कार्य पुनर्संचयित केले, असं डॉ. सराफ म्हणाले.

# मिठी नदी पुनरुज्जीवन प्रकल्पाचे ६४ टक्के काम पूर्ण!



**मुंबई। प्रतिनिधी,**

मिठी नदीच्या पाण्याची गुणवत्ता सुधारण्यासाठी सुरू असलेल्या मिठी नदी पुनरुज्जीवन प्रकल्प- पॅकेज चार अंतर्गत मुंबई महानगरपालिकेने २.६० मीटर व्यास असलेल्या भूमिगत मलजल बोगद्याचे खणन हाती घेतले आहे. बापट नाला आणि सफेद पूल नाल्यापासून धारावी मलजल प्रक्रिया प्रकल्पापर्यंत हा बोगदा तयार करण्यात येत आहे. एकूण तीन टप्प्यांत हे काम होत आहे. यापैकी, दुस-या टप्प्यातील मलजल बोगद्याचे ब्रेक-थ्रू यशस्वीपणे पूर्ण झाले. बापट नाला आणि सफेद पूल नाल्यातून मिठी नदीत जाणारे अंदाजे १६८ दशलक्ष लीटर प्रतिदिन इतके पाणी या भूमिगत मलजल बोगद्याद्वारे धारावी येथील मलजल प्रक्रिया केंद्रात वाहून नेण्यात येणार आहे. त्यानंतर मलजलावर प्रक्रिया करून माहीम निसर्ग उद्यान येथील खाडीत सोडण्यात येणार आहे. या प्रकल्पामुळे मिठी नदीचे पाणी स्वच्छ राहण्यास मदत होणार आहे, पर्यायाने पर्यावरणाचेही संतूलन टिकून राहणार आहे. पालिका आयुक्त डॉ. इकबाल सिंह चहल आणि अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) पी. वेलरासू यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रकल्प साकारतो आहे. सांडपाणी मिश्रित पाणी मिठी नदीमध्ये न जाता या पाण्यावर प्रक्रिया करण्याच्या अनुषंगाने या प्रकल्पाचे महत्व अधिक आहे. मिठी नदीमध्ये सांडपाणी मिश्रित होण्याआधीच या पाण्यावर प्रक्रिया करण्यात येणार आहे. परिणामी समुद्र किनारा परिसर स्वच्छ राहतानाच पर्यावरणालाही या प्रक्रिया केलेल्या पाण्याचा फायदा होणार आहे. तसेच समुद्र किनारी परिसरात राहणाऱ्या नागरिकांनाही या पाण्याचा फायदा होईल, अशी माहिती वेलरासू यांनी दिली. दरम्यान आता, तिस-या टप्प्यात सांताक्रूज-चेंबूर जोडरस्ता जंक्शन शाफ्ट ते बापट नाला या मार्गावर भूमिगत बोगदा खोदण्यात येणार आहे. तिस-या आणि अंतिम टप्प्यातील या बोगद्याचे काम लवकरच सुरू होणार आहे. त्याची एकूण लांबी ३.१० किलोमीटर असेल. या संपूर्ण प्रकल्पाची एकूण मलजल वहन क्षमता प्रतिदिन ४०० दशलक्ष लीटर इतकी आहे. सध्या यातून प्रतिदिन १६८ दशलक्ष लीटर इतका बिगर पावसाळी प्रवाह वाहून नेण्यात येणार आहे.मुंबई महानगरातील लोकसंख्या वाढीचे प्रमाण लक्षात घेत सन २०५१ पर्यंतचे नियोजन या बोगद्याच्या माध्यमातून करण्यात आले आहे. मुंबई मलनिःसारण प्रकल्प अंतर्गत हा भूमिगत मलजल बोगदा बांधण्यात येत आहे. बोगद्याची एकूण लांबी ६.७० किलोमीटर तर सरासरी खोली सुमारे १५ मीटर आहे. भारतातील सर्वात लहान व्यासाचा असा हा मलजल बोगदा आहे. त्याचा अंतर्गत व्यास २.६० मीटर आहे. तर बाह्य व्यास ३.२० मीटर आहे. बोगद्याच्या संरेखनामध्ये एकूण ५ शाफ्ट प्रस्तावित आहेत. हा मलजल बोगदा सेगमेंटल लाइनिंग पद्धतीने तसेच अर्थ प्रेशर बॅलन्स टनेल बोरिंग मशीन वापरून बांधला जात आहे.

# पनवेलमध्ये १५६ कोटींची रस्त्यांची कामे; कळंबोली, खारघर, कामोठे, पनवेल शहर, तोंडरे येथील रस्त्यांचा समावेश



**पनवेल। प्रतिनिधी,**

पनवेल शहर महापालिकेने पुन्हा वर्षाच्या सुरुवातीला १५६ कोटी रुपयांच्या रस्ते बांधकामाची कामे हाती घेतली असून ही कामे कळंबोली, खारघर, कामोठे या वसाहतींबरोबरच पनवेल शहर आणि तोंडरे गावात केली जाणार आहेत. या कामांमध्ये रस्त्यांचे काँक्रीटीकरण आणि डांबरीकरणासाठी विकासकामांच्या निविदा खुल्या करण्यात आल्या आहेत. निविदा प्रक्रिया पार पडल्यानंतर वर्षभरात ही कामे पूर्ण करण्याचे पालिकेचे नियोजन आहे.

पनवेल महापालिका क्षेत्रात चार महिन्यांपूर्वी पालिका प्रशासकांनी २३७ कोटी रुपयांची रस्त्यांची विकासकामे सिडको वसाहतींमध्ये हाती घेतली. या कामांचे कार्यादेश संबंधित ठेकेदारांना देण्यात आले असून येत्या आठवडाभरात २३७ कोटी रुपयांचे रस्त्यांचे काँक्रीटीकरणाचे काम सुरू होईल. मुख्य रस्त्यांच्या काँक्रीटीकरणाच्या कामानंतर पनवेल महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांनी पालिका क्षेत्र खड्डेमुक्त करण्याचे नियोजन केले होते. त्याच संकल्पनेचा दुसरा टप्पा म्हणून पनवेलमधील अंतर्गत रस्त्यांच्या कामांच्या ५६ कोटी रुपयांच्या प्रस्तावाला नुकत्याच पार पडलेल्या प्रशासकीय सर्वसाधारण सभेत मंजुरी देण्यात आली होती. या मंजुरीनंतर पनवेल पालिकेने १५६ कोटी रुपयांची निविदा जाहीर केली आहे. सुमारे ४०० कोटी रुपये पालिका रस्त्यांसाठी खर्च करणार असल्याने काही महिन्यांत रस्त्यांची कामे सर्वत्र सुरू होतील. रस्त्यांबरोबरच पालिकेने यातील काही रस्त्यांशेजारील पावसाळी पाणी वाहणाऱ्या गटारांची खोली व रुंदीकरणाची कामे हाती घेतली आहेत. खारघर, कळंबोली, कामोठे, तळोजा, नवीन पनवेल या सिडको वसाहतींमध्ये मागील सहा वर्षांत पनवेल महापालिकेने मोठी कामे हाती घेतली नव्हती.

स्वच्छता आणि आरोग्याची सुविधा वगळता रस्त्यांकडे पालिकेने उशिराने लक्ष केंद्रित केले. सर्वसाधारण सभेत मंजुरीनंतर संबंधित रस्त्यांच्या कामांविषयी निविदा काढण्यात आली आहे.

# जिल्ह्यातील प्रदूषणकारी कारखान्यांची संख्या चिंताजनक, ठाणे जिल्ह्यातील प्रदूषणकारी कारखान्यांची संख्या २ हजार २९४

**ठाणे। प्रतिनिधी,**

मुंबईसह ठाणे जिल्ह्यातील हवा प्रदूषित असल्याचे अनेकदा विविध अहवालांतून समोर आले आहे. असे असतानाच आता जिल्ह्यातील विविध प्रदूषण नियंत्रण मंडळांकडून दरवर्षी प्रमाणे जाहीर करण्यात येणाऱ्या संवर्गनिहाय कारखान्यांच्या अहवालातून जिल्ह्यात २ हजार २९४ कारखान्यांचा प्रदूषण निदेर्शांक ६० पेक्षा अधिक म्हणजेच प्रदूषणकारी असल्याची माहिती समोर आली आहे. याच बरोबर ४१ ते ५९ इतका प्रदूषण निदेर्शांक असलेल्या कारखान्यांची संख्या देखील १ हजार ८९५च्या घरात आहे. तर यामध्ये सर्वाधिक १०९७ इतक्या प्रदूषणकारी कारखान्यांची संख्या ठाणे जिल्ह्यात आहे. जिल्ह्यातील अंबरनाथ, कल्याण, डोंबिवली, उल्हासनगर आणि ठाणे शहरातील हवेची गुणवत्ता अनेकदा खराब असल्याचे विविध अहवालांतून समोर येत असते. कारखाने आणि वाहनांमुळे मोठ्या प्रमाणात प्रदूषण होत असल्याचे या अहवालातून दिसून येत असते. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाद्वारे प्रदूषण रोखण्यासाठी उपायोजना राबविण्यात येत असल्या तरी अनेक कारखान्यांच्या मनमानी कारभारामुळे जिल्ह्याच्या हवा आणि पाणी प्रदूषणात सतत वाढ होत असल्याचे अनेकदा दिसून आले आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळाद्वारे कारखान्यांतून उत्सर्जित होणारे वायू आणि सोडण्यात येणारे सांडपाणी यांचे नमुने घेऊन प्रत्येक कारखान्याचा प्रदूषण निदेर्शांक ठरविण्यात येतो. यानुसार जिल्ह्यातील २ हजार २९४ कारखान्यांचा निदेर्शांक हा ६० हून अधिक आहे. यामुळे हे कारखाने इतर कारखान्यांच्या तुलनेत अधिक प्रदूषणकारी असल्याचे समोर आले आहे. तर प्रदूषण करणाऱ्या कारखान्यांच्या विरोधात वेळोवेळी दंडात्मक आणि कठोर कारवाई करण्यात येत असल्याची माहिती जिल्ह्यातील स्थानिक प्रदूषण नियंत्रण मंडळांच्या विभाग कार्यालयातून देण्यात आली आहे.

# यंदा ठाण्याच्या गृहउत्सवात शंभरहून अधिक प्रकल्प, क्रेडाई-एमसीएचआय संस्थेचे मालमत्ता प्रदर्शन

**ठाणे । प्रतिनिधी,**

ठाण्यातील बांधकाम व्यावसायिकांच्या क्रेडाई-एमसीएचआय ठाणे या संस्थेकडून यंदाही शहरात मालमत्ता प्रदर्शनाच्या माध्यमातून गृहउत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या उत्सवात शंभरहून अधिक गृहप्रकल्पांचा समावेश असून या प्रदर्शनात विनामुल्य प्रवेश असणार आहे. प्रदर्शन स्थळापर्यंतच्या प्रवासासाठी ठाणे पूर्व येथून मोफत बसगाड्यांची सुविधा उपलब्ध देण्याबरोबरच पुनर्विकास, महारेरा विषयावर परिसंवाद आणि गृहनिर्माण संस्थांसाठी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. त्याचबरोबर या प्रदर्शनात व्ही.आर कंपनीच्या स्टॉलवर ठाणे शहराची आभासी पद्धतीने हेलिकॉप्टर सैर करण्यात येणार आहे.

ठाणे येथील पोखरण रोड क्रमांक १ वरील रेमंड कंपनीच्या मैदानात १६ ते १९ फेब्रुवारी या कालावधीत सकाळी ११ ते सायंकाळी ७.३० यावेळेत २१ व्या मालमत्ता प्रदर्शनांतर्गत गृहउत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते गृहउत्सवाचे उद्घाटन होणार आहे. त्याचबरोबर रेमंड उद्योग समुहाचे व्यवस्थापकीय संचालक गौतम सिंघानिया, महापालिका आयुक्त अभिजीत बांगर, पोलीस आयुक्त आशुतोष डुंबरे आणि ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे हे उपस्थित असणार आहेत. या उत्सवात ठाणे शहरातील शंभरहून अधिक गृहप्रकल्प असणार आहेत. ५० हून अधिक बांधकाम व्यावसायिकांचा सहभाग असणार आहे. १५ हून अधिक बँका व गृहकर्ज वित्तीय संस्था सहभागी होणार आहेत. या उत्सवात शंभरहून अधिक गृहप्रकल्पांचा समावेश असून या प्रदर्शनात विनामुल्य प्रवेश असणार आहे. प्रदर्शन स्थळापर्यंतच्या प्रवासासाठी ठाणे पूर्व येथून मोफत बसगाड्यांची तसेच मोफत पार्किंगची सुविधा उपलब्ध देण्यात येणार आहे, अशी माहिती क्रेडाई-एमसीएचआय ठाणेचे अध्यक्ष जितेंद्र मेहता यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली. यंदाच्या प्रदर्शनाच्या माध्यमातून ग्राहकांना गृहकर्जाबरोबरच विविध स्तरांतील घरांचे पर्याय उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. यंदाच्या प्रदर्शनाला घरखरेदीसाठी उत्सुक असलेले २० हजारांहून अधिक कुटुंबे भेट देतील, असे ठाणे प्रदर्शन समितीचे अध्यक्ष संदीप माहेश्वरी यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेला संस्थेचे पदाधिकारी मनिष खंडेलवाल, गौरव शर्मा, जय व्होरा, निमित महेता, भावेश गांधी, सचिन मिराणी आणि संस्थेचे माजी अध्यक्ष शैलेश पुराणिक हे उपस्थित होते. यंदाच्या प्रदर्शनात १६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ५ वाजता कल आज और कल- महारेरा याविषयावर प्रसिद्ध सनदी लेखापाल (सीए) अश्विन शाह यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले आहे. या



व्याख्यान कार्यक्रमातून नागरिकांना महारेरा कायद्याविषयी सविस्तर माहिती नागरिकांना जाणून घेता येणार आहे. त्याचबरोबर १८ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वाजता ठाणे शहराचा पुनर्विकास याविषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे.